पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/५५०२८८/२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक- ०२ /१२/२०२३

**प्रेसनोट दि. ०२/१२/२०२३**

**लक्झरी ट्रॅव्हल्स बसेस यांना पिंपरी चिंचवड हद्दीतील मार्गावर प्रवासी घेणेस मनाई बाबत**

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे असुन देहु व आळंदी हि संतांची भुमी आहे. पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत पिंपरी बाजारपेठ हि पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत सर्वात मोठी बाजारपेठ आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता त्याअनुषंगाने राज्यातील तसेच देशातील नागरिक हे उदरनिर्वाहाकरीता पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात स्थायिक झालेने शहराचा विकास तसेच वाढ हि वेगाने होत आहे. नागरिक आपले गावी जाणे येणे करीता प्रामुख्याने लक्झरी ट्रॅव्हल्स बसेसचा पर्याय निवडत असून लक्झरी ट्रॅव्हल्स बसेस या निगडी, तळवडे, भोसरी हद्दीतून महाराष्ट्रात तसेच देशाचे विविध राज्यात येत जात असतात.

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीतील निगडी, तळवडे व भोसरी येथून लक्झरी ट्रॅव्हल्स बसेस ये-जा करत असताना मार्गातील पवळे ब्रिज, खंडोबा माळ, चिंचवड, बिजली नगर, चिंतामणी चौक, अहिंसा चौक, चाफेकर चौक,थेरगाव, बिर्ला हॉस्पीटल, डांगे चौक, काळेवाडी, नाशिक फाटा, फुगेवाडी इ. तसेच इतर कोणत्याही ठिकाणी प्रवासी घेण्यास थांबत असल्याने सदर लक्झरी ट्रॅव्हल्स बसेसमुळे वाहतूक कोंडीत दिवसेंदिवस वाढ होत असून अपघातांचे संख्येतदेखील वाढ होत आहे. सदर लक्झरी ट्रॅव्हल्स बसेसना मुळ ठिकाणाहून निघाल्यानंतर पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत प्रवासी घेण्यास मनाई करण्यात येत आहे.

निगडी येथील भक्ती शक्ती सर्कल तसेच तळवडे येथील टॉवर लाईन व रुपीनगर तसेच भोसरी येथील गावजत्रा मैदान व बाबर पेट्रोलपंप लांडेवाडी हे लक्झरी ट्रॅव्हल्स बसेस यांना पिक अप व ड्रॉप पॉईंट पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेकडून निश्चत करण्यात आलेले असून त्याव्यतिरिक्त लक्झरी ट्रॅव्हल्स बसेस थांबल्यास सदर बसेसवर संबंधित वाहतूक विभागांकडून कडक दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची सर्व लक्झरी बस चालक, मालक तसेच बुकिंग घेणारे एजंट यांनी नोंद घ्यावी. तसेच नागरिकांनी देखील आपली गैरसोय टाळण्याकरीता निगडी येथील भक्ती शक्ती सर्कल, तळवडे येथील टॉवर लाईन, रुपीनगर, भोसरी येथील गावजत्रा मैदान व बाबर पेट्रोलपंप लांडेवाडी या ठिकाणांवरुनच प्रवास सुरु करावा असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेमार्फतीने सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.

02/12/2023.

(बापू बांगर)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नवीन मध्यवर्ती इमारत पुणे

प्रत : १) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

Scanned with CamScanner